वाचा :-१. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन, महसूल व वने, मंत्रालय यांचे कडील पत्र दिनांक ५ फेब्रुवारी२०२०

३. भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे कडील पत्र क्रमांक १३७/२०१८/ FTS१०५४८ दिनांक ४ फेब्रुवारी, २०२०.

---

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**सातारा**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा
क्र.नैआ/कावि/ 788. /2020
दिनांक :-15/03/2020.

आदेश

ज्याअर्थी, शासनाने करोना विषाणूचा (कोविड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3 व 4 मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमिक केलेली आहे.

ज्याअर्थी,आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, अंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणू संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहे. तसेच अंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसार्गात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती सातारा जिल्ह्यात उद्भवू नये यासाठी पूर्वतयारी करणे अगत्याचे झाले आहे.

या पार्श्वभूमीवर मी **शेखर सिंह, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, सातारा** जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ लागु झाल्याचे या आदेशाद्वारे घोषीत करीत आहे. उक्त पूर्वतयारी व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी **Incident Commander** म्हणून **श्री. डॉ. अमोद गडीकर, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सातारा मो. 9422471912 cssatara@rediffmail.com व श्री. डॉ. अनिरुध्द आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा मो. 9421233250** dhozpsatara@gmail.com यांना सनियंत्रक म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी, मी शेखर सिंह, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सातारा असा आदेश देतो की, कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून या कार्यालयाकडील क्र.नै.आ.कावी/625/2020 , दि. 15/03/2020 रोजीचे आदेशान्वये जीवनावश्यक वस्तुंची दुकाने वगळून जिल्हयातील दुकाने व आस्थापना दि. 31 मार्च 2020 पर्यंत बंद करणेत आलेल्या होत्या तथापि सदरचे आदेशान्वये सातारा जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागातील सर्व कृषी सेवा केंद्रे ( शेतीसाठी आवश्यक असलेली खते , औषधे बी बीयाने विक्री करणारी दुकाने )पूर्ववत चालू करणेत येत आहेत.

जिल्हाधिकारी
जिल्हा सातारा

(शेखर सिंह)
जिल्हाधिकारी सातारा तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा

प्रति,

1 पोलीस अधिक्षक , सातारा

2. सह.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन , सातारा

3 सर्व संबंधित विभाग प्रमुख जि.सातारा.

Scanned by CamScanner